# मुक्ताई दूत

RNI-MHMAR/26/A1057

epaper.muktaidoot.com
27 Jul 2026 - Page 2


## वारीत भक्तीसोबत सायबर सुरक्षिततेचाही संदेश; 'Cyber Safe Warkari' उपक्रमातून ५०० हून अधिक वारकऱ्यांमध्ये जनजागृती





**मुक्ताईनगर (अमोल वैद्य, संपादक)** : आषाढी वारीच्या भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांना सायबर सुरक्षेचा संदेश देणारा 'Cyber Safe Warkari' हा अभिनव जनजागृती उपक्रम उत्साहात पार पडला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील Quick Heal Cyber Warrior Club, क्विक हील फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून ५०० हून अधिक वारकरी भाविकांपर्यंत डिजिटल सुरक्षिततेचा संदेश पोहोचविण्यात आला.

'Cyber Shiksha for Cyber Suraksha' अभियानांतर्गत ह.भ.प. स्व. त्र्यंबकराव आनंदराव पाटील यांच्या प्रेरणेतून समस्त गावकरी मंडळी, नांदवेल यांच्या आयोजित पायी वारीत हा उपक्रम राबविण्यात आला. प्रा. डॉ. अमरदीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शिक्षक समन्वयक डॉ. राजू आमले यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर वॉरियर्सनी प्रभावी जनजागृती केली.

यावेळी नांदवेल येथील रहिवासी तथा खामगाव येथील उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) प्रदीप पाटील यांनी वारकरी भाविकांना सायबर गुन्ह्यांचे बदलते स्वरूप, ऑनलाइन फसवणुकीपासून बचावाचे उपाय, सुरक्षित डिजिटल व्यवहार आणि सायबर सुरक्षेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थितांमध्ये डिजिटल व्यवहार करताना अधिक सजग राहण्याची जाणीव निर्माण झाली.

उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी ऑनलाइन दर्शनाच्या नावाखाली होणारी फसवणूक, बनावट देणगी लिंक, ओटीपी आणि क्यूआर कोड स्कॅम, सोशल मीडियावरील फसवणूक तसेच बनावट कस्टमर केअर कॉल्स याविषयी प्रत्यक्ष संवाद आणि प्रभावी पथनाट्याद्वारे जनजागृती केली. वारकऱ्यांना माहितीपत्रकांचे वाटप करून संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे, ओटीपी, बँक खात्याची माहिती अथवा गोपनीय माहिती कोणालाही न देणे तसेच फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

आषाढी एकादशीनिमित्त आलेल्या तीन पालख्यांसमोर स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या २० सायबर वॉरियर्सनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत नृत्य, पथनाट्य आणि सायबर सुरक्षेवरील संदेश सादर केले. एका विद्यार्थ्याने भगवान विठ्ठल तर एका विद्यार्थिनीने माता रुक्मिणी यांची वेशभूषा साकारत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पोस्टर्स, जनजागृती फलक आणि विशेष कॅप्सच्या माध्यमातून 'सायबर वारकरी' ही अभिनव संकल्पना प्रभावीपणे साकारण्यात आली.

या उपक्रमाला वारकरी भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर सुरक्षेबाबत विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. श्रद्धा, सेवा, सामाजिक बांधिलकी आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाने समाजप्रबोधनाचा आदर्श निर्माण केला असून, वारीच्या पवित्र परंपरेतून दिलेला सायबर सुरक्षिततेचा संदेश डिजिटल युगात प्रत्येक नागरिकासाठी तितकाच महत्त्वाचा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.